दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१२ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १६८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 12 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 168 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### मुंबईच्या महापौरपदी भाजपच्या रितू तावडे

**मुंबई**–मुंबई महापालिकेच्या महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीची आज औपचारिकता पार पडली. त्यानुसार, महापौरपदी भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका रितू राजेश तावडे यांची, तर उपमहापौरपदी सत्ताधारी शिवसेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक संजय घाडी यांची नियुक्ती झाली आहे. मुंबई महापालिकेचे प्रशासक भूषण गगराणी यांनी या दोघांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महापालिकेत विरोधी बाकावर बसण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तावडे व घाडी यांची निवडणूक बिनविरोध झाली आहे. या दोघांनीही आपल्या निवडीनंतर तत्काळ पदभार स्वीकारला.

# परळीतील ऐतिहासिक महापशूधन एक्स्पोचे शुक्रवारी ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते उद्घाटन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १५ ऐवजी १४ तारखेला येणार,पशू प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात

### एक हजाराहून अधिक विविध पशूंचा सहभाग,बीडसह राज्यातील पशू पालकांनी प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे केले आवाहन

#### पशुप्रदर्शन ऐतिहासिक

या प्रदर्शनात पशु पालकांना गायी,म्हशी, घोडे,शेळ्या–मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत.केवळ महाराष्ट्रच नव्हे,तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत.पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे.राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे.परळी वैजनाथ येथेप्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधना साठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे.

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरा वरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे.दरम्यान,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार १४ तारखेला परळीत येणार आहेत. परळी शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाच्या जय्यत तयारीला सध्या वेग आला आहे.शुक्रवारी १३ तारखेला सकाळी ११ वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

#### हा अत्यंत सुंदर योगायोग

**महाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे.या खात्याची मंत्री म्हणून परळीत असे प्रदर्शन व्हावे अशी माझी इच्छा होती.नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशु पालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन ना.पंकजाताई यांनी केले आहे.**



#### मुख्यमंत्री १५ ऐवजी १४ तारखेला परळीत येणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निमंत्रण पत्रिकेनुसार प्रदर्शनाच्या समारोपाला म्हणजे रविवारी १५ तारखेला येणार होते परंतु ते आता शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शहरात येणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्याउपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## सख्ख्या भावाकडूनच अल्पवयीन बहिणीवर वारंवार अत्याचार; पीडितेने दिला बाळाला जन्म!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना नंदुरबार जिल्ह्यातील एका तालुक्यातील एका गावात उघडकीस आली आहे. एका नराधम सख्ख्या भावानेच आपल्या १७ वर्षीय अल्पवयीन बहिणीला जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केले. या नराधमाच्या अत्याचारामुळे पीडित बालिका गर्भवती राहिली असून, सोमवारी दिनांक तिने एका बाळाला जन्म दिला आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात संबंधित नराधम भावाविरुद्ध पोक्सो आणि भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पीडित १७ वर्षीय बालिका आणि आरोपी हे सख्खे भाऊ–बहीण आहेत. जून २०२५ मध्ये घरातील आई–वडील आणि इतर सदस्य शेतात कामाला गेलेले असताना, आरोपीने पीडितेच्या अज्ञानाचा फायदा घेतला. तिला जीवे मारण्याची धमकी देऊन, जबरदस्तीने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतरही त्याने भीती दाखवून वेळोवेळी तिच्यावर अत्याचार करणे सुरूच ठेवले.

या अत्याचारामुळे पीडित बालिका गर्भवती राहिली होती. सोमवारी (दि. १० फेब्रुवारी) तिला प्रसूती कळा येऊ लागल्याने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिने एका मुलाला जन्म दिला. हॉस्पिटल प्रशासनाकडून माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ धाव घेऊन पीडितेचा जबाब नोंदवला. पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून हा सर्व धक्कादायक प्रकार समोर आला.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४, ६४(२)(एफ)(एम), ३५१(२)(३) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम कलम ४, ५, ६, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

घटनेनंतर आरोपी फरार झाला असून, त्याच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक रवाना करण्यात आले आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पाटील हे करत आहेत.सध्या पीडित मुलगी रुग्णालयात उपचार घेत असून तिची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

## जांभली येथे नदीपात्रात पडून वृद्धाचा मृत्यू

### अक्कलकुवा तालुक्यातील जुगलखेत येथील घटना

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुक्यातील जांभली गावात देवनदीच्या पात्रात पडून एका ७६ वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उमऱ्या इंद्या पाडवी (राहणार जुगलखेत पाटीलपाडा) असे मृत व्यक्तीचे नाव असून, याप्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मयत उमऱ्या पाडवी हे सोमवारी (दिनांक.९ रोजी) सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास जांभली गावातील देवनदीच्या कडेला असलेल्या टेकडीवरून पायी जात होते. यावेळी अंधारामुळे किंवा अन्य कारणाने त्यांचा पाय घसरला आणि ते थेट नदीच्या पात्रात कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. मंगळवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.या घटनेची माहिती मयताचा मुलगा देवलसिंग पाडवी यांनी मोलगी पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यू नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार दिलीप फुलसिंग चौरे हे करीत आहेत. सदर घटनेचा प्राथमिक अहवाल अक्कलकुवा येथील कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे माहितीसाठी सादर करण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण अधिक स्पष्ट होईल.



## संस्कारांची शिदोरी! रांझनी आश्रमशाळेत मातृ–पितृ पूजन सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

येथील श्री साईनाथ शिक्षण संस्था संचलित विद्यावर्धिनी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत 'मातृ–पितृ पूजन' कार्यक्रम अत्यंत भावूक आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. कै. नानासाहेब जगन्नाथ त्रंबक वाणी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या आई–वडिलांच्या चरणांचे पूजन केले. आपल्या पाल्यांकडून मिळालेला हा सन्मान पाहून अनेक पालकांचे डोळे पाणावले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून आई–वडिलांचे जीवनातील स्थान आणि त्यांच्या कष्टांविषयी भावना व्यक्त केल्या. प्राथमिक शिक्षक धनंजय मराठे यांनी आईवर आधारित हृदयस्पर्शी गाणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव गुलाबराव चव्हाण होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मानद सचिव सी. एम. पाटील उपस्थित होते. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापक भाऊसाहेब कुवर, माध्यमिक मुख्याध्यापक शालिग्राम वाणी तसेच शिक्षक भूषण येवले व राजेश पाडवी यांनी पालकांप्रती आपल्या भावना व्यक्त करत विद्यार्थ्यांना संस्कारांचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश रामोळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक मालपुरे यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मनोज चिंचोले, रामकृष्ण शिंदे, महेश सैंदाने, गणपत वळवी, स्वामी जाधव, प्रकाश पाडवी, पूजा वसावे, मित्रविंदा पाठक, अजय कुंभार, जयेश मालपुरे, निलेश चव्हाण, प्रेम माळी, नानाभाऊ मोरे, राकेश चव्हाण, पुरुषोत्तम मोरे, बोधिबाई वसावे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.आजच्या आधुनिक काळात मुलांवर भारतीय संस्कृतीचे आणि कृतज्ञतेचे संस्कार व्हावेत, या उद्देशाने रांझनी आश्रमशाळेने राबवलेल्या या उपक्रमाचे परिसरातून विशेष कौतुक होत आहे.



## देशव्यापी आम हडतालला आयटकचा पाठिंबा; १२ फेब्रुवारीला सिरोंचा नगरपंचायतीत सफाई काम बंद

दैनिक वादळ वार्ता

**नारायणपूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने लागू केलेले कामगारविरोधी चार लेबर कोड रद्द करावेत, या प्रमुख मागणीसाठी सेंट्रल ट्रेड युनियन व संयुक्त किसान मोर्चा यांच्या संयुक्त आह्वानावरून दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी आम हडताल आयोजित करण्यात आली आहे. या आम हडतालला आयटक अहेरी विधानसभा शाखेने जाहीर पाठिंबा दिला आहे.या संदर्भात आयटकच्या वतीने नगरपंचायत सिरोंचा येथील मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. सदर लेबर कोड कामगारांच्या नोकरीची सुरक्षितता, वेतन, सामाजिक सुरक्षा व संघटन स्वातंत्र्यावर घाला घालणारे असून त्याचा सर्वाधिक फटका सफाई कामगार, कंत्राटी व असंघटित क्षेत्रातील कामगारांना बसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर नगरपंचायत सिरोंचा अंतर्गत कार्यरत सफाई कामगार दिनांक १२ फेब्रुवारी रोजी आम हडतालला समर्थन म्हणून सफाई काम बंद ठेवणार असल्याची माहिती आयटकने दिली आहे. हा निर्णय लोकशाही मार्गाने व कामगारांच्या हक्कांसाठी घेतल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



कॉ सचिन मोतकुरवार अहेरी विधानसभा अध्यक्ष आयटक यांचा आदेशानुसार सदर निवेदन आयटक अहेरी विधानसभा शाखेचे सिरोंचा तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी आणि प्रशासनाने याची दखल घेऊन सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# संपादकीय

## मराठी शाळा व संस्कृती वाचवणार कोण?

मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात असं आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.काही वर्षांपूर्वीची गोष्ट, मुंबईतील मराठमोळ्या ग्रँट रोड परिसरात राहणारे माझे मित्र किस्सा सांगत होते. मराठी भाषेचा अभिमान म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीला ग्रँट रोड येथील एका नामांकित मराठी शाळेत प्रवेश घेतला. काही वर्षे गेल्यानंतर अचानक एक दिवस त्या शाळा व्यवस्थापनाने मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला व तसे पालकांना कळवले. माझे मित्र धडाडीचे कार्यकर्ते होते. ग्रँट रोड सारख्या मराठमोळ्या विभागातील नामांकित मराठी शाळा बंद पडते म्हणून त्यांनी थेट तेथील कार्यकर्त्यांना हाताशी धरले व शाळा व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी शाळेत पोहोचले. प्रथम वादावादी झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली व सुचवले की आम्ही मराठी शाळा सुरू ठेवण्यास तयार आहोत,फक्त तुमची जबाबदारी विद्यार्थी आणून देण्याची राहील, ते झाले तरच आम्ही शाळा सुरू करू शकतो, हे सांगताच सर्वच विषयावर पडदा टाकावा लागला. कारण त्यावर ना पालकांकडे उत्तर होते ना शाळा व्यवस्थापकांकडे. या सर्वाला जबाबदार होती ती पालकांची द्विधा मानसिकता. असो. विषय असा, की मराठी शाळा असो किंवा मराठी संस्कृती असो ती टिकवायची कोणी त्याचे खापर प्रशासनावर फोडायचे, की त्याची सर्वस्वी जबाबदारी आपण जनतेने घ्यावी का? याला नेमके जबाबदार कोण? घरात मराठी हवी मात्र बाहेर पडल्यावर हिंदी अथवा इंग्रजीतच बोलावे ही सध्याची मानसिकता. मग आपण प्रशासनाकडे का बोट दाखवायचे. त्यातही आपल्या आजूबाजूला मराठीसाठी व मराठी संस्कृती टिकण्यासाठी झटणारे बरेच असतात त्यातलंच एक मराठी अभ्यास केंद्र. आजच विषय का काढावा लागला कारण मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत हे मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते. यांनी नुकतीच पालिका आयुक्तांची भेट घेतली. कारण होते मराठी शाळा बंद पडण्याच्या विषयावर मुंबई महापालिका आयुक्तांची भूमिका काय? विषयाला चांगली सुरुवात झाली असताना मात्र आयुक्तांनी घुमजाव केले असा या मराठी अभ्यास केंद्राचा आरोप आहे. पालिकेच्या सहा शाळांचा खासगीकरणाचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. त्यात पालिकेच्या शाळा फक्त सीबीएससी व आयसीएससी का? यामुळे प्रादेशिक माध्यमांच्या शाळा बंद पडतील असा धोकाही व्यक्त करण्यात आला. यावर पालिका आयुक्त गगराणी यांच्या मते या सहा शाळांचा विषय म्हणजे शाळांचे खासगीकरण नाही तर भूखंडाचे खासगीकरण आहे. या चुकीच्या बातम्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्याबाबतचे सादरीकरण त्यांच्या माध्यमातून केले गेले. पालिकेकडे पडलेले भूखंड चटईक्षेत्र निर्देशानुसार बदल्यात जे उपलब्ध होतात तो हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण मराठी शाळांचा आग्रह धरू नये का? असा प्रश्न विचारला तेव्हा गगराणी यांनी हा आग्रह आम्हाला धरायचा नाही असे स्पष्ट म्हटले व हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगितले .गगराणी यांनी मुंबईतील कुठलीही इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यास त्याच काय करायचं हे महापालिकेचे धोरण आहे असे म्हटले. परंतु, शाळांची इमारत वर्षानुवर्षे पूर्ण होत नाही ही वस्तुस्तिथी आयुक्तांना पटली. पाडकाम करणाऱ्या शाळांच्या बाबतीत पालकांना विश्वासात घेतले जात नाही अशी भूमिका मांडली गेली असता गगराणी यांनी ही भूमिका बरोबर असल्याचे मान्य करत पालकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिले. सगळी मुलं विस्थापित झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. दीड वर्षे मुलांची फरपट झाली ही भूमिका स्पष्टपणे मांडली. गगराणी यांनी समन्वयाचा अभाव असल्याबाबत मान्य केले. यानंतर समन्वयाचा अभाव राहणार नाही त्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.मुंबई पब्लिक स्कूलचा जो प्रयोग मुंबई महानगरपालिका करत आहे तो थांबवण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. सीबीएससी किंवा इतर मंडळाच्या ज्या शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या सुरू करण्याबाबत याबाबत भूमिका मांडली व त्या काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा याबाबत चर्चा झाली. मराठी भाषा संवर्धन समिती स्थापन करण्याबाबत भूमिका मांडली गेली. अंगणवाड्यांसोबत जोडून घेऊन मराठी अभ्यास केंद्राला काम करता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली व प्रस्ताव ठेवण्यात आला. मुंबई महानगरपालिका मराठीसाठी जे काही काम करते त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्याचं असं म्हणणं होतं की मुंबई महानगरपालिका मराठी शाळांसाठी काहीच करत नाही, असं जे चित्र उभं केलं आहे ते चुकीचं आहे. पालिका मराठीसाठी काय काय करतं याची जंत्रीच पालिका आयुक्तांनी मांडली. तर मुंबई महानगरपालिका परिपत्रक आदेश मराठी काढतात, विविध दिन साजरे करतात, विविध प्रकाशने काढतात, मराठीचा वापर, अभिनय स्पर्धा घेतात, साहित्य संमेलनाला मदत करतात, कर्मचाऱ्यांच्या विविध परीक्षा घेतात, प्रत्येक खात्यात मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला आहे, पुस्तके विक्री करतात, नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना ५० टक्के सूट देतात, कर्मचाऱ्यांसाठी अभिनय स्पर्धा राबवतात गगराणी यांनी खासगी संस्थांच्या शाळा सुद्धा बंद पडत आहेत असं म्हटलं आहे. त्यांनाही तुम्ही विचारलं पाहिजे असं सुचवलं. मराठी शाळा का बंद पडत आहे.हा सामाजिक प्रश्न आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. फक्त आमच्या शाळेची संख्या कमी होत आहे असे नाही, तर इतर खासगी शाळा सुद्धा बंद पडत आहेत. गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत महानगरपालिकेच्या मराठी शाळांचा ९५ टक्के इतका निकाल लागला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीत ९७ टक्के इतके गुण पटकावले आहेत. यासोबतच गुणवत्ता वाढ, सराव परीक्षा असे उपक्रम राबविण्यात येतात. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाचे फी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांना २७ प्रकारच्या शैक्षणिक वस्तूंचे मोफत वाटप केले जाते. महानगरपालिकेचा विद्यार्थी खासगी शाळेपेक्षाही अधिक गुणसंपन्न आणि त्याच्याकडे विविध शैक्षणिक सुविधा असाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्न करते. पालिकेने फाऊंडेशनल लिटरसी व न्यूमरसी निपूण भारतअंतर्गत महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमुळे तिसऱ्या इयत्तेतील प्रत्येक माध्यमाचा विद्यार्थी उत्तम प्रकारे वाचू शकतो. तसेच, त्या–त्या स्तरावरील गणिताचे ज्ञानही त्याला उत्तमरीत्या अवगत होत आहे. यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून याच चांगले परिणाम दिसून येत आहे. मुंबईतील मराठी शाळा आणि शिक्षण हा सामजिक आणि शैक्षणिक मुद्दा आहे. पालिका प्रशासनाकडून कोणत्याही माध्यमांच्या शाळांचे खासगीकरण करण्यात आले नाही, असा दावा केला. तरीही मुंबई उपनगरातील मराठी शाळा बंद पडत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात अन्यथा आज पालिका आयुक्तांनी मराठी शाळेबाबत व सर्वस्वी मराठीबाबत आपले भूमिका मांडली. येणाऱ्या काळात ती मांडण्याची संधी मुंबईकरांना मिळणार नाही हे निश्चित.

### तळोदा तालुक्यातील शाळांमध्ये अवतरले 'डिजिटल अंतरिक्ष'

# पोलाद स्टील कंपनीच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांनी अनुभवला चंद्रयानाचा थरार!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना विज्ञानाची जोड देण्यासाठी जालन्याची नामांकित पोलाद स्टील कंपनी सरसावली आहे. कंपनीच्या सामाजिक बांधिलकीतून तळोदा तालुक्यातील विविध शाळांमध्ये 'डिजिटल तारांगण' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आकाशगंगेचे आणि भारताच्या अभिमानास्पद 'चंद्रयान १, २ व ३' मोहिमांचे दर्शन घडविण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी चक्क आपल्या शाळेतच अवकाशाचा थरार अनुभवला. ग्रह-तारे, सूर्यमाला आणि चंद्रयान या गोष्टी आतापर्यंत विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकात वाचल्या होत्या किंवा वर्तमानपत्रात पाहिल्या होत्या. मात्र, पोलाद स्टील कंपनीने आधुनिक डिजिटल यंत्रणेच्या माध्यमातून शाळेतच तारांगण उभे केले. या चित्रफिती पाहताना आपल्याला प्रत्यक्षात अवकाशात असल्याचा भास विद्यार्थ्यांना झाला. विशेषतः यावर्षी इस्रोच्या चंद्रयान मोहिमेचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये मोहिमेची तयारी आणि प्रत्यक्ष चंद्रावर उतरण्यापर्यंतचा प्रवास अतिशय रंजक पद्धतीने दाखवण्यात आला. गेल्या वर्षी विविध ग्रहांची माहिती मिळाल्यानंतर, यावर्षीची चंद्रयान मोहीम विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरली. मॉडर्न इंग्लिश स्कूल



व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य निलेश सूर्यवंशी यांनी या उपक्रमाचे महत्त्व ओळखून याला विशेष प्राधान्य दिले. शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे सुयोग्य नियोजन करून हा उपक्रम यशस्वी केला. मनोज आगलावे व रामकृष्ण चव्हाण (ऑपरेटर): यांनी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना अवकाशाची सफर घडवून आणली.निलेश सूर्यवंशी (प्राचार्य): यांच्या मार्गदर्शनाखाली मॉडर्न इंग्लिश स्कूल बोरद मध्ये हा सोहळा पार पडला. पोलाद स्टील कंपनीने केवळ व्यापार न करता समाजातील भावी पिढीच्या बौद्धिक विकासासाठी उचललेले हे पाऊल खरोखरच 'पोलादी' निश्चयाचे प्रतीक आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांच्या डोळ्यातील विज्ञानाची चमक कंपनीच्या यशाची पावती देत होती.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण व्हावी आणि त्यांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान कळावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पोलाद स्टील कंपनीचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे.**
**– निलेश सूर्यवंशी, प्राचार्य मॉडर्न इंग्लिश स्कूल व जुनियर कॉलेज बोरद.**

**शाळेतील आम्हा सर्व मुलांना अवकाश गंगेचे दर्शन घडविण्यात आले त्याबद्दल आम्ही पोलाद कंपनीचे मनापासून आभार व्यक्त करतो की, ज्यांनी प्रत्यक्षात ग्रामीण भागातील शाळांची निवड केली जे ग्रामीण भागातील विद्यार्थी या गोष्टींपासून अनभिज्ञ आहेत अशा आमच्या सारख्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी डिजिटल माध्यमातून अवकाश दर्शन घडवले म्हणून आम्ही त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.**
**सुप्रिया जगताप, नम्रता पाटील.**
**विद्यार्थिनी मॉडर्न इंग्लिश स्कूलवर ज्युनिअर कॉलेज बोरद**

# पनवेलमध्ये भाजपयुतीचा दणदणीत विजय

### पनवेल मध्ये शेकापच्या नेत्यांनी कार्यकर्ते घडू दिले नाहीत, नेत्यांनी पक्षाचे सर्व पत्ते आपल्याकडे ठेवलेयशेकापचा सर्व बालेकिल्ले ढासळलेय 'सुपडा साफ किया रे'–माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांची जल्लोषात प्रतिक्रिया

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये अनेक वर्ष अभेद सत्ता करणाऱ्या शेकापचा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप महायुतीने दारुण पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. पनवेल तालुक्यातील ८ पैकी ८ जिल्हा परिषदेच्या जागा तर पनवेल पंचायत समितीच्या १६ पैकी १५ जागांवर विजय मिळवला. दीर्घकाळ शेकापच्या ताब्यात असलेला हा राजकीय गड भाजप महायुतीने उध्वस्त करत शेकापचा सुपडासाफ करून पनवेल पंचायत समितीवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. या विजयामुळे पनवेल तालुक्यात शेकापची जुलमी व दडपशाहीची सत्ता उलथवून लावण्यात भाजप महायुतीला मोठे यश मिळाले असून, जनतेने विकास, पारदर्शकता व सक्षम नेतृत्वावर आपला ठाम विश्वास व्यक्त केला. निवडणूक निकालानंतर संपूर्ण पनवेल तालुक्यात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले, 'भाजपमहायुतीचा विजय असो', 'एकच वादा प्रशांतदादा' अशा जोरदार घोषणा



देत कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.. भाजप महायुतीच्या नेतृत्वाने पनवेल तालुक्यातील विकास, पायाभूत सुविधा, शेतकरी, युवक व महिला सक्षमीकरण या मुद्द्यांवर विश्वासार्ह भूमिका मांडली. याच भूमिकेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद देत भाजप महायुतीला स्पष्ट कौल दिला आहे.या विजयामुळे आगामी काळात पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून, जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी भाजप महायुती कटिबद्ध राहील, असा विश्वास यावेळी नेतृत्वाने व्यक्त केला. शेकापचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील यांना आपला वावंजे जिल्हा परिषद गट राखता आला नाही या सारखी ती शोकांतिका काय? या मतदार संघात महाविकास आघाडीचे मातब्बर नेते आहेत. पण त्यांची काहीही जादू चालली नाही. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली एकनाथ देशेकर आणि टीमने शेकापचा दारुण पराभव केला. कायम शेकापचा बालेकिल्ला असलेला वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघ भाजपने काबीज केला. शेकापमध्ये ठराविक लोकांच्या हातात पक्ष ठेवला कार्यकर्ते घडविण्याचा प्रयत्न केला नाही त्यामुळे कार्यकर्ते कंटाळून भाजपकडे गेले.यांनी आपली व्यथा माजी आमदार विवेक पाटील यांची तळोजा कारागृहात भेट घेऊन सांगितल्याचे समजते.गव्हाण जिल्हा परिषद गटातून निकिता निलेश खारकर, वावंजे जिल्हा परिषद गटातून कमला एकनाथ देशेकर, नेरे जिल्हा परिषद गटातून आत्माराम बाळू भस्मा, पालीदेवद जिल्हा परिषद गटातून प्राची अमित जाधव, पळस्पे जिल्हा परिषद गटातून हर्षदा अतुल घरत, वावेघर जिल्हा परिषद गटातून अनन्या अविनाश गाताडे, वडघर जिल्हा परिषद गटातून सोनाली अनुज जितेकर, केळवणे जिल्हा परिषद गटातून मंगेश रामचंद्र वाकडीकर यांनी, यांनी दणदणीत विजय मिळवला. या सर्व विजयी उमेदवारांचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी अभिनंदन केले . यावेळी पनवेलमध्ये ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषणेने विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी जल्लोषाच्यावेळी 'सुपडा साफ किया रे' अशी जोरदार प्रतिक्रिया दिली

# नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत घवघवीत विजय संपादन करून श्री दशरथ भगत साहेब बहुमताने नवी मुंबईचे उपमहापौर म्हणून निवडून आले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत घवघवीत विजय संपादन करून श्री दशरथ भगत साहेब बहुमताने नवी मुंबईचे उपमहापौर म्हणून निवडून आले, ही बाब अत्यंत गौरवास्पद व नवी मुंबईच्या सार्वजनिक जीवनातील एक ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या या दणदणीत यशाबद्दल बुद्ध प्रतिष्ठान, वाशी – नवी मुंबईतील एक अग्रगण्य, सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठित व सेवाभावी संस्था – यांच्या वतीने आम्ही त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करीत आहोत.श्री दशरथ भगत साहेब हे नवी मुंबईचे शिल्पकार, विद्यमान आमदार व महाराष्ट्र राज्याचे माननीय वनमंत्री मा. गणेशदादा नाईक साहेब यांचे घनिष्ठ, विश्वासू व निष्ठावंत कार्यकर्ते असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवेचे संस्कार त्यांनी आत्मसात केले आहेत. जनतेशी थेट संवाद ठेवणारे, तळागाळातील प्रश्नांना



प्राधान्य देणारे आणि लोकहितासाठी अखंड कार्य करणारे नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या प्रामाणिक कार्यामुळे नवी मुंबईतील नागरिकांमध्ये अपार विश्वास व आदर निर्माण झाला असून, मिळालेले हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण सेवाभावाचे फलित आहे. हा विजय केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण नवी मुंबईच्या जनतेच्या अपेक्षांचा आणि विश्वासाचा विजय आहे. सामाजिक, धार्मिक व सेवाभावी क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय असून, त्यांच्या कार्यात त्यांच्या सौभाग्यवती पत्नी व सुपुत्र सक्रिय सहभाग घेत समाजसेवेचा आदर्श घडवत आहेत. अशा संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ आणि कुटुंबवत्सल नेतृत्वाचा उपमहापौर पदावर उदय होणे हे नवी मुंबईच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत आशादायक आहे.बुद्ध प्रतिष्ठान संस्थेशी त्यांचे विशेष आत्मीयतेचे नाते असून, संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांनी नेहमीच सक्रिय सहकार्य, मार्गदर्शन व पाठबळ दिले आहे. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला मार्गदर्शक मानून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची दिशा ठरवली असल्यामुळे बौद्ध समाजासह सर्व समाजघटकांमध्ये त्यांना विशेष मान, स्नेह व विश्वास लाभला आहे. नवी मुंबईतील आघाडीची सामाजिक संस्था असलेल्या बुद्ध प्रतिष्ठान, वाशी यांच्या वतीने आम्ही पुनश्च एकदा श्री दशरथ भगत साहेबांना या गौरवशाली यशाबद्दल हार्दिक हार्दिक शुभेच्छा अर्पण करीत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई अधिक सक्षम, न्यायप्रिय व प्रगत होवो, हीच सदिच्छा व्यक्त करीत आहोत.

# व्यवस्थेला दोष देत बसण्यापेक्षा परीस्थिती बदला–मीनल संचिती,उपायुक्त

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कोणतीही परिस्थिती बदलायची असेल तर त्यासाठी तुम्हाला मेहनत करावी लागेल, आपल्या सभोवतालची सिस्टीम, व्यवस्था खराब आहे त्याला दोष देऊन उपयोग नाही. नियमित अभ्यास आणि मेहनत यामुळे तुमची परिस्थिती बदलते असा सल्ला ठाणे महापालिका उपायुक्त मीनल संचिती यानी एका कार्यक्रमात दिला. ठाणे महापालिका व रोटरी क्लबच्या वतीने आयोजित केलेल्या एसी, रेफ्रिजरेटर, वॉटर कुलर या उपकरणांच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवीप्रदान कार्यक्रमात त्या बोलत होत्या. नौपाडा येथील पालिका शाळा क्र १९ येथील रोटरी सेंटर मध्ये




या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब ऑफ लेक सिटी, रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ व ब्लू स्टार कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक १९, विष्णुनगर, ठाणे (प) येथे स्किल डेव्हलपमेंट सेंटर सुरू करण्यात आलेले आहे. पहिल्या टप्प्यात ११ मुलानी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. तीन महिन्याचे हे प्रशिक्षण असून ते मोफत आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना नोकरी व व्यवसायसाठी देखील रोटरीतर्फे सहकार्य केले जाते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिस्ट्रिक्ट ३१४२चे प्रांतपाल हर्ष माकोल, प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे पालिकेच्या शिक्षण उपआयुक्त मिताली संचेती, ठाणे महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी बढे सर, ब्लू स्टार ट्रेनिंग सेंटरचे मॅनेजर हरीश हे उपस्थित होते. तसेच यावेळी नियोजित प्रांतपाल चंद्रहास शेट्टी, माझी प्रांतपाल डॉक्टर मोहन चंदावरकर, रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटीचे अध्यक्ष सुरेश कल्याणकर, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्षा श्रीमती ममता वंजानी, जगदीश चेलारमानी, प्रशांत पात्रो, मेधा जोशी, देवयानी वेद, सुनील सोमण, राजेश परांजपे, नियोजित अध्यक्ष निशा कपीला, यतीन कोळंबेकर आणि अनेक रोटेरियन्स उपस्थित होते.यावेळी ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण उपायुक्त श्रीमती मिताली संचेती यांनी पूर्ण सेंटरची पाहणी करून सर्व उपक्रमाची माहिती घेतली आणि त्या आपल्या मनोगतात म्हणाल्या की रोटरीने हा चालू केलेला उपक्रम हा एक अभिनव असा उपक्रम असून याच्यात रोटरी विद्यार्थ्यांना पूर्णपणे अती उच्च प्रतीच्या साधन सामुग्रीसह प्रशिक्षण देतच आहेत तसेच त्यांनी त्यांना रोजगार निर्मितीचे पण साधन निर्माण करून दिलेला आहे. यावेळी त्या म्हणाल्या की या उपक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना फायदा मिळण्यासाठी त्या ठाणे महानगरपालिकेतर्फे सर्वतोपरी मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

# तोरणमाळची महाशिवरात्री यात्रा निर्विघ्न पार पडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज

## शहादा उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तोरणमाळ येथे होणारी श्री गोरक्षनाथ महाराज महाशिवरात्री यात्रा यंदा दिनांक १३ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या यात्रेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लाखो भाविकांची सुरक्षा आणि सोयीसुविधा लक्षात घेऊन दिनांक ११ रोजी तोरणमाळ येथे महत्त्वाची नियोजन बैठक पार पडली. शहादा उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत यात्रेच्या सूक्ष्म नियोजनावर भर देण्यात आला.



बैठकीत दत्ता पवार यांनी मंदिर समिती आणि प्रशासकीय यंत्रणेला स्पष्ट निर्देश दिले. यात्रेच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन करणे हे सर्वात मोठे आव्हान असते. त्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात मंदिरात दर्शनासाठी महिला आणि पुरुषांच्या स्वतंत्र रांगा लावण्यात येतील. चेंगराचेंगरी टाळण्यासाठी दिवस-रात्र स्वयंसेवकांची नियुक्ती केली जाणार आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव संपूर्ण मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून पोलिसांची करडी नजर असेल.महिला व मुलांच्या सुरक्षेला प्राधान्य देत, छेडछाड रोखण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात येतील. तसेच महिलांना कपडे बदलण्यासाठी सुरक्षित कक्षाची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तोरणमाळ येथील यशवंत तलावात अनेक भाविक आंघोळीसाठी उतरतात. पाण्याचा अंदाज न आल्याने होणारे अपघात टाळण्यासाठी तलावात पाण्याची पातळी निश्चित करणारी चिन्हे लावण्यात येणार आहेत. तसेच तलाव परिसरात आपत्कालीन स्थितीसाठी 'जीवरक्षक' तैनात करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यात्रेच्या काळात कोणतीही आरोग्य समस्या उद्भवल्यास तात्काळ उपचार मिळावेत, यासाठी तोरणमाळ वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुरेसा औषधसाठा आणि विशेष वैद्यकीय पथक तैनात ठेवण्यास सांगितले आहे. तसेच दुकानांच्या ठिकाणी आणि गर्दीच्या ठिकाणी आग प्रतिबंधक उपकरणे बसवण्याच्या सूचना दुकानदारांना देण्यात आल्या आहेत.

मंदिराचे महंत संजुनाथ महाराज यांना सूचना देण्यात आली की, कोणत्याही भाविकावर दानपात्रात दान करण्यासाठी सक्ती केली जाऊ नये. तसेच महाप्रसाद वाटपाच्या वेळी होणारी गर्दी टाळण्यासाठी स्वयंसेवकांद्वारे शिस्तबद्ध नियोजन करावे.

या नियोजित बैठकीला शहादा उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्यासह म्हसावद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे, पोलिस हवालदार दादाभाई साबळे, रणसिंग सनेर, पोलीस कॉन्स्टेबल उमेश पावरा, दीपक पाटील उपस्थित होते. तसेच ग्रामसेवक, तलाठी, वनरक्षक, पोलीस पाटील, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष आणि स्थानिक व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.संतोष गिरी यांना दिल्ली येथे मानद डॉक्टरेट प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**दिल्ली । प्रतिनिधी**

शेतकरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने कार्य करणारे,गिरी पीसीएमबी क्लासेसचे संचालक प्राध्यापक संतोष धोंडू गिरी यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

दिल्ली येथील हॉटेल रेडिसन ब्ल्यू, पश्चिम विहार येथे पं.दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठ,वृंदावन धाम (मथुरा) यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय हिंदी संगोष्ठी व सन्मान समारंभात हा गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अरविंद कुमार, अध्यक्षस्थानी डॉ इंदु भूषण मिश्रा, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ.शरत दुबे तिवारी उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते प्रा. गिरी यांना मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रा.संतोष गिरी हे ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना सवलती,मार्गदर्शन व शिस्तबद्ध अभ्यासपद्धती देण्यावर त्यांचा भर आहे.त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाकडे वाटचाल करत आहेत.

सन्मान स्वीकारताना प्रा.संतोष गिरी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा सन्मान माझा नसून माझ्या विद्यार्थ्यांचा आहे.त्यांच्या यशामुळेच मला काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यांच्या या भावनिक शब्दांनी सभागृहात उपस्थितांच्या टाळ्यांचा कडकडाट झाला.दरम्यान,गिरी पीसीएमबी क्लासेसतर्फे विद्यार्थ्यांसाठी १२ फेब्रुवारीपासून सिटी छएएढ व गएए च्या नवीन बॅचेस सुरू होत असून, शिस्तबद्ध अभ्यास, डाऊट सॉल्व्हिंग, डे-बोर्डिंग व मोबाईल-फ्री संकल्पनेवर आधारित शिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.

## मा.मारोतराव कवळे गुरूजी यांनी वाहीली बारामती येथे स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



दैनिक वादळ वार्ता

**बारामती । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना बारामतीत सहयोग निवास स्थानी शेतकरी नेते मारोतराव पा.कवळे गुरुजी यांनी श्रद्धांजली वाहिली सर्वसामान्यांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत अनेकांना या घटनेने मोठा धक्का बसला आहे. अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावी, कणखर आणि निर्णायक नेतृत्व मानले जात होते. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबीयांना आणि समर्थकांना धैर्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना....!

# आ.धर्मराव बाबा आत्राम यांच्या निर्देशाने अखेर सिरोंचा-कोर्ला बस सेवा सुरु

## राकॉ कार्यकारी जिल्हाध्यक्ष बानय्या जनगाम यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक वादळ वार्ता

**सिरोंचा । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून सिरोंचा तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या कोर्ला या परिसरातील बससेवा बंद आहे, यामुळे या भागातील शालेय विद्यार्थ्यांसह प्रवाशांना प्रचंड मनस्तान सहन करावा लागत आहे,या गंभीर बाबीकडे राकॉंचे कार्यकारी जिल्हाध्यक्ष बानय्या जनगाम यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार धर्मरावबाबा आत्राम यांचे लक्ष वेधित सिरोंचा-कोर्ला-झिंगानूर मार्गे तत्काळ बस सुरु करण्याची मागणी निवेदनातून केली.राकॉ कार्यकारी जिल्हाध्यक्ष बानय्या जनगाम यांनी वेळोवेळी आमदार धर्मराव बाबा आत्राम तथा अहेरी आगारातील अधिकाऱ्यांना पाठपुरावा केली असून दिलेल्या निवेदनाची दखल घेत आमदार धर्मराव बाबा आत्राम यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या अहेरी आगार येथील अधिकाऱ्यांना बस सुरु करण्याची निर्देश दिले त्यानुसार सिरोंचा-कोर्ला - झिंगानूर बस सुरु केल्याने परिसरातील नागरिक आनंद व्यक्त केली आहे.आणि नागरिकांची प्रवास सुखकर झाली आहे.




# रेपनपल्ली बटालियन तर्फे विद्यार्थ्यांना संगणक आणि नोटबुक

दैनिक वादळ वार्ता

**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त अहेरी तहसीलमध्ये स्थित केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ९ व्या बटालियनने ९ व्या बटालियनचे कमांडंट आणि रेपनपल्ली उप-पोलीस स्टेशनच्या परिसरात महिला, विद्यार्थी आणि गरजू नागरिकांसाठी नागरी कृती कार्यक्रम आयोजित केला. श्री सत्य नारायण मीना (सेकंड-इन-कमांड) यांच्या अध्यक्षतेखाली कंपनीच्या जबाबदारीच्या क्षेत्रातील (रेपनपल्ली, लिंगमपल्ली, गुंडेरा, मद्देमदागु, कोडसेलागुडेम, छेलेवाडा, मारीगुडेम, बिमरगुडेम, तातीगुडेम आणि कमलापूर ही गावे) विद्यार्थ्यांना संगणक संच आणि नोटबुक वाटप करण्यात आले आणि गरजू ग्रामस्थ आणि महिलांना



स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई मशीन, स्वयंपाकघरातील भांडी, खुर्च्या, साड्या आणि टॉवेल वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला सीआरपीएफच्या ९ व्या बटालियनच्या ई कंपनीचे कंपनी कमांडर इन्स्पेक्टर गणपत सिंग, रेपनपल्ली उप-पोलिस स्टेशनचे एपीआय इन्चार्ज श्री. भास्कर कांबळे, मुख्याध्यापिका श्री. बाबुराव कोडापे, सरपंच श्रीमती रजनीता लक्ष्मण मडावी आणि सैनिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. गावातील सर्व मान्यवर आणि शाळेतील मुलांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. ग्रामस्थांनी आणि शाळेतील शिक्षकांनी सीआरपीएफ आणि रेपनपल्ली उप-पोलिस स्टेशनचे कौतुक केले, जे नेहमीच ग्रामस्थांना मदत करतात.

## चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

# स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो-हनुमंत भोसले सर

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

कै. यशवंतराव चाटे शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण संस्था तांबवा संचलित चाटे इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५ / २६ या वर्षामधील स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला चाटे इंग्लिश स्कूलचे संस्थापक श्री शिवाजी चाटे सर केज नगरपंचायत च्या प्रथम नागरिक सीताताई बनसोड, डॉक्टर दिनकर राऊत अध्यक्ष आय एम ए, काझी जैनुल आबेदिन सइदोदिन, मा. क्षीरसागर डी बी, सुनील केंद्रे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती केज, वडवले एल बि इ. मा. बालकल्याण अधिकारी, दिपाली ताई चाटे, गोपीचंद सपाटे दादासाहेब कराड, रमाकांत बापू संस्थापक लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज केज, लक्ष्मण बारगजे निरीक्षक इतर मागासवर्गीय कल्याण बीड, दत्तात्रेय चाटे, स्वप्निल उनवणे, ज्येष्ठ नेते किसन दादा कदम, हनुमंत सौदागर, श्री हनुमंत भोसले सर समाजसेवक कविता कराड मॅडम ऍड.



मल्हारी आदाटे संभाजीनगर हायकोर्ट, दादासाहेब कराड संस्थापक संत ज्ञानेश्वर गुरुकुल केज, शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छवा संघटना बीड, दिनकर चाटे यांच्यासह माता पालक वर्ग व सर्व पत्रकार बांधव यांच्या उपस्थितीत सर्व बालकलाकारांनी विविध गाण्यावरती सादरीकरण करून सर्वांचे मन जिंकली...कार्यक्रमाची सुरुवात व उद्घाटन केज नगरपंचायत च्या नगराध्यक्ष शिताताई बनसोड व हनुमंत भोसले सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली याप्रसंगी सर्व मान्यवर उपस्थित होते शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या परंपरागत वंदनीय अभ्यासगतम सुस्वागतम या गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले यावेळी बोलताना हनुमंत भोसले सर उपस्थित विद्यार्थी व माता पालक वर्ग यांना संबोधित करताना स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधूनच आदर्श कलाकार घडतात जीवनामध्ये कोणतीही गोष्ट अशक्य नसते परंतु ते मिळवण्यासाठी सदैव एक चांगली शाळा व शाळेमध्ये होणारे विविध कार्यक्रम यांच्या माध्यमातून होते. आपण सदैव कार्य मग्न असावे लागते सर्व विद्यार्थ्यांनी चाटे इंग्लिश स्कूल च्या माध्यमातून आपले ध्येय निश्चित करून नोकरी कलाक्षेत्र व्यावसायिक समाजशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये जाऊन नावलौकिक करावे असे आव्हान स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून हनुमंत भोसले सर यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोपात सीताताई बनसोड यांनी या शाळेचे व सर्व विद्यार्थी शिक्षकांचे तसेच चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांचे कौतुक करून या शाळेमध्ये खरोखरच केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य देखील रुजवले जातात अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या देशाची खरी संस्कृती जोपासली जाते सहभागी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावरती भाग घेवून यामध्ये लोकगीत, शेतकरी गीत, कव्वाली, मराठमोळी गाणी, लावण्या, कोळीगीत, देशभक्तीपर गीत, अभंग, लोकनृत्य मराठमोळी लावणी, नृत्य सादर केली शाळेतील सर्व वर्गशिक्षक यांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे कला सादर करता यावी यासाठी खूप प्रयत्न केले व विद्यार्थ्यांनीही उपस्थित सर्व माता पालक वर्ग यांना आपापल्या कला सादर करून आनंदी केले या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडे मॅडम यांनी केले तर मान्यवर व पालकांचे चाटे स्कूलच्या वतीने आभार चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांनी केले

# मुलभूत सुविधा पासुन वंचित असलेल्या शिक्षक कालनी दत्त गृहनिर्माण सोसायटीतील सभासद यांचा पुढाकार

## त्रस्त रहिवाशांनी स्वखर्चातून बनवला ३० फुटी रस्ता

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील बीड रोड ते उमरी रोडला जोडणाऱ्या शिक्षक कॉलनी मधील रस्त्याच्या दुरवस्थेकडे नगरपंचायत प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केल्याने, अखेर श्री दत्त गृहनिर्माण संस्थेतील सभासदांनी एकत्र येत पदरमोड करून रस्ता तयार केला आहे. प्रशासनाच्या 'जाग' येण्याची वाट न पाहता नागरिकांनी दाखवलेल्या या एकजुटीची शहरात मोठी चर्चा होत आहे. महत्त्वाचा कनेक्टिव्हिटी रस्ता अखेर खुला झाला.

शिक्षक कॉलनीतील एम. डी.घुले सर,पिंटू भैया तांदळे,अरूण बप्पा धस सर,नारायण घुले,संदीप भुतडा,सुर्यवंशी सर, धनराज शिंपले सर, पत्रकार प्रकाश मुंडे, अंधारे सर,अजित धिवार, चौरे सर ते उमरी रोड या भागाला जोडणारा ३० फुटी रस्ता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.पाच सोसायटींचा हा परिसर एन.ए,लेआउट मान्यता प्राप्त असतानाही रस्ते आणि मूलभूत सुविधां पासून वंचित होता.या रस्त्याअभावी शाळकरी मुले,स्कूल बस,मोठी व लहान वाहने आणि स्थानिक रहिवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

**यांनी घेतले पुढाकार**

नगरपंचायतीकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून सोसायटीतील जागरूक सभासदांनी स्वतः पुढाकार घेतला. यामध्ये प्रा.ईश्वर मुंडे, अंधारे सर,कराड साहेब, काकड सर,स्वामी साहेब, धिवार साहेब,पत्रकार प्रकाश मुंडे,अशोक बडे सर व इतर सभासदांनी आर्थिक योगदान देऊन हा रस्ता तयार केला.यामुळे याभागातील दळणवळणा चा मोठा प्रश्न सुटला असून रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**महसूल देऊनही सुविधा शून्य**


या भागातील सर्वे नंबर १८/३ व १८/२ हे क्षेत्र जिल्हाधिकारी मान्यता प्राप्त अकृषीक (N.A.) क्षेत्र आहे.येथील प्लॉट धारकांनी नोंदणीच्या (Registry) माध्यमातून शासनाकडे मोठ्या प्रमाणात महसूल जमा केला आहे.तरीही नगरपंचायत प्रशासना कडून या भागाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.प्रमुख समस्या ज्यांच्या कडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.अद्याप पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही,सांडपाणी उपसा, कागदावर रस्ते आणि नाल्या असूनही प्रत्यक्षात त्या बनवलेल्या नाहीत. **अनेक ठिकाणी अद्याप विजेचे खांब किंवा लाईन पोहोचलेली नाही.**

प्रशासनाला नागरिकांचा सवाल आम्ही नियमा नुसार सर्व कर आणि महसूल भरतो,मग मूलभूत सुविधांसाठी आम्हाला स्वतःचा खिसा का रिकामा करावा लागतो? असा संतप्त सवाल रहिवाशांनी विचारला आहे. प्रशासनाने आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावे आणि या भागातील रस्ते,नाल्या आणि वीज पुरवठा तात्काळ सुरळीत करावा,अशी मागणी करण्यात आली आहे



# शासनाने प्रवर्गनिहाय जनगणना करावी-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



सन २०२६-२७ मध्ये होणाऱ्या आगामी जनगणनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रमाणे एससी, एसटी,इतर मागासवर्गीय, ओबीसी,विमुक्त जाती, भटक्या व अर्ध भटक्या जमातीसाठी स्वतंत्र प्रवर्ग तयार करून प्रवर्गनिहाय जनगणना करण्यात यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांच्या वतीने करण्यात आली आहे.भारत सरकारने डिसेंबर २०२५ मध्ये जाहीर केलेल्या जनगणना योजनेनुसार दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये जातीनिहाय जनगणना प्रस्तावित आहे मात्र पहिल्या टप्प्यासाठी तयार करण्यात आलेल्या घरांच्या यादीच्या प्रश्नावलीत केवळ एससी, एसटी,व इतर असेच पर्याय देण्यात आले असून ओबीसी विमुक्त जाती,(डी एन टी) व भटक्या जमातीसाठी स्वतंत्र श्रेणीचा अभाव आहे यामुळे ओबीसी विमुक्त भटक्यावर अर्ध भटक्या जमातीची अचूक गणना होईल की नाही याबाबत शंका निर्माण झालेली आहे.याचा परिणाम जातीनिहाय जनगणणेवर होण्याची भीती निवेदनात व्यक्त करण्यात आलेली आहे जनगणनेच्या घर यादी करण व लोकसंख्या गणना या दोन्ही टप्प्यात एससी,एसटी प्रमाणे ओबीसी,विमुक्त भटक्या, व अर्ध भटक्या,जमाती साठी स्वतंत्र प्रवर्ग तयार करण्यात यावा तसेच कुटुंब प्रमुखांच्या श्रेणी मध्ये ओबीसी डी एन टी हे पर्याय समाविष्ट करावेत व्यक्तीच्या जात उपजाती सह विमुक्त भटक्या व अर्ध भटक्या जमातीची स्थिती स्वतंत्रपणे नोंदवावी तसेच केंद्र व राज्याच्या ओबीसी व डी एन टी याद्या एकत्र करून डुप्लिकेशन मुक्त कोड निर्देशिका तयार करून त्यानुसार जनगणना करण्यात यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा.बबनराव आंधळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# घरकुल लाभधारकाचे जन-जीवन विस्कळीत

## प्रलंबित हप्ते तात्काळ द्यावेत,लाभार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या अभियंता व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा-जीवन हांगे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



प्रधानमंत्री आवास योजना,रमाई आवास, आदी घरकुल योजनांतील लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तात्काळ द्यावेत तसेच संबंधित अभियंता व ऑपरेटर यांच्यावर चौकशी करून कारवाई करावी,अशी लेखी मागणी करण्यात आली आहे.सामाजिक कार्यकर्ते स्थानिक पदाधिकारी जीवन आबा हांगे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांनादिलेल्या निवेदनातून ही बाब पुढे आली.निवेदनात नमूद केल्या प्रमाणे,केज तालुक्यातील काही गावांतील घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर पुढील हप्ते मंजूर होत नसल्याच्या तक्रारी आहेत.अनेक लाभार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून बांधकाम अर्धवट अवस्थेत अडकले आहे.यामुळे कुटुंबांना राहण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे पत्रात म्हटले आहे.या सोबतच, काही ठिकाणी हप्ते मिळण्यासाठी अवैध पैशांची मागणी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अभियंता व संगणक ऑपरेटर यांच्या कडून लाभार्थ्यांकडे पैसे मागितले जात असल्याची तक्रार लोकांकडून होत असल्याचे पत्रात नमूद आहे.गरीब लाभार्थ्यांची अडवणूक थांबवून, त्यांना त्वरित न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.जीवन आबा हांगे यांनी प्रशासनाला इशारा देत,जर तातडीने कारवाई झाली नाही तर आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही दिला आहे.त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच सर्व पात्रलाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करावेत,अशी मागणी केली आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड,उप मुख्य कार्यकारीअधिकारी (ग्रामीण विकास) तसेच संबंधित ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. प्रशासनाकडून चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# केंद्र सरकारच्या कामगार कायद्याविरोधातील उद्याच्या भारत बंदला काँग्रेसचा पाठिंबा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रातील भाजपा सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलाला देशभरातून तीव्र विरोध केला जात आहे. या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा कामगार संघटनांनी उद्या गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत बंदची हाक दिली आहे. शेतकऱ्यांच्या विविध संघटनांनीही या भारत बंदला पाठिंबा दिला असून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनेही उद्याच्या भारत बंदला पाठिंबा दिलेला आहे.




केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलांमुळे कामगारांच्या समोर विविध प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत. कामगार कायद्यातील बदलामुळे कामगारांच्या हिताला बाधा पोहचलेली आहे, या नव्या बदलामुळे कामगारांच्या हाताला कमी संधी मिळणार आहे. केंद्रातील भाजपा सरकारचे धोरण हे शेतकरी व कामगार विरोधी असल्याने या बंदमध्ये काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे, अशा सुचना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ऍड गणेश पाटील यांनी दिली आहे

# निष्ठा,प्रामाणिकता आणि जबाबदारीतूनच खरे यश मिळते

## मुख्यमंत्री फेलोशिप व विधि विधान इंटर्नशिप तुकडींच्या अभ्यास भेटीत विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अरविंद बनसोडे कुरनूरकर आज दि. ११ फेब्रुवारी : सामाजिक प्रश्न सोडवताना निष्ठा, प्रामाणिकता आणि जबाबदारीतूनच खरे यश मिळते. प्रश्न फक्त प्रसिद्धीसाठी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या हितासाठी मांडले गेले पाहिजेत, असे प्रतिपादन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.



विधानभवनात 'मुख्यमंत्री फेलोशिप' कार्यक्रमाअंतर्गत कार्यरत फेलोजची ७ वी तुकडी तसेच 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमांतर्गत विद्यार्थींची ५ वी तुकडी यांच्यासाठी अभ्यासभेट, मार्गदर्शन व चर्चा-संवाद आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-३ डॉ. विलास आठवले कार्यक्रमाचे समन्वयक प्रिया खान, सह सचिव नागनाथ थिटे, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक निलेश मदाने आणि मुख्यमंत्री फेलोशिप' कार्यक्रमातील सातवी तुकडी आणि 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमातील विद्यार्थी उपस्थित होते.

'मुख्यमंत्री फेलोशिप' कार्यक्रमातील सातवी तुकडी आणि 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमातील पाचवी तुकडी यांच्या अभ्यासभेटी व मार्गदर्शन सत्रात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी फेलो व इंटर्न्सना मार्गदर्शन केले. या संवादात्मक सत्रात डॉ. गोऱ्हे यांनी युवा पिढीला त कायदे, शासनाच्या योजना आदी क्षेत्रांचा सखोल अभ्यास करून समाजहिताचे कार्य करण्याचे आवाहन केले. डॉ. गोऱ्हे यांनी कामाच्या व्यस्ततेतही स्वतःसाठी वेळ देण्याचे, निसर्ग, संगीत व छंद यांच्या माध्यमातून तणाव व्यवस्थापनाचे महत्त्व सांगितले. राजकारण म्हणजे समस्यांतून मार्ग काढण्याची कला आहे. सतत लोकांशी जोडून राहणे आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तर देणे, हेच खरे लोकप्रतिनिधित्व आहे, असे त्यांनी नमूद केले.या मार्गदर्शन सत्रात फेलो व इंटर्न्सनी विविध सामाजिक व धोरणात्मक प्रश्नांवर विचारमंथन केले. डॉ. गोऱ्हे यांनी त्यांच्या उत्सुकतेचे कौतुक करून, प्रश्नांची मांडणी करताना तथ्य, पुरावे आणि सखोल माहिती वापरणे गरजेचे आहे,असे सांगत त्यांना भविष्यातील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी विधानमंडळाचे दोन्ही सभागृह, ग्रंथालयास भेट देऊन माहिती घेतली.

# चेरपल्लीत विज्ञान महाविद्यालयाचे रासेयो शिबीर

दैनिक वादळ वार्ता
**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी नुकतेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चेरपल्ली येथे राजे धर्मराव विज्ञान महाविद्यालय, अहेरी यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) अंतर्गत सशक्त भारत व डिजिटल साक्षरते करिता युवाशक्ती या संकल्पनेवर आधारितु विशेष श्रम संस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उद्घाटन समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री. सुहास वसावे , सहायक प्रकल्प अधिकारी अहेरी, ज्यांनी नुकतीच राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण करून सहायक राज्यकर आयुक्त हे पद मिळवलेले आहे हे उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, स्वयंसेवक तसेच शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुहास वसावे यांच्या हस्ते एन एस एस चे ध्वजारोहण करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पचे सहा. प्रकल्पधिकारी सुहास वसावे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम. चालूरकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, शिस्त व सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पटवून दिले.

राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी दया मेश्राम (नागेपल्ली) यांनी एन.एस.एस. च्या कार्याबद्दल माहिती देत आपले अनुभव विद्यार्थ्यांसोबत हितगुज केला.माननीय प्रा. रमेश हलामी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, अहेरी माननीय डॉ. श्यामल बिस्वास यांनी मांडली.याप्रसंगी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चेरपल्लीचे मुख्याध्यापक सुधाकर भोसरे यांनी उपक्रमासाठी संपूर्ण सहकार्याची हमी दिली.

तसेच माननीय प्रा. अनिकेत गोंडे यांनी विद्यार्थ्यांना यूपीएससी स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान राजे धर्मराव विज्ञान महाविद्यालय, अहेरी तर्फे सहाय्यक प्रकल्पधिकारी सुहास वसावे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नुकतेच प्राचार्य पदावर नवनियुक्त व पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल माननीय डॉ. सी. एम. चालूरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला डॉ. सुनंदा पाल , प्रा. कांचन धुर्वे , प्रा. आदेश मंचलवार , प्रा. अनिकेत गोंडे सश्रयांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का कुडकालवार व अंकुश रातपल्लीवर यांनी केले. सोशल मीडिया व्यवस्थापनाची जबाबदारी प्रशांत येलमुले, प्रियांशू मडावी व राकेश लेंडगुरे यांनी सांभाळली.

या उपक्रमात एन.एस.एस. स्वयंसेवक धनराज समुद्रालवार, ओंकार भुजाडी, राजकुमार आकुधारी, ओंकार निखाडे, कु. नेहा नैताम, नाजमीन शेख, शिवानी लेकामी, छाया राऊत तसेच इतर विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहायक अधिकारी माननीय डॉ. राठोड यांनी आभार प्रदर्शन केले.सर्वांच्या सहकार्यामुळे हा उद्घाटन समारंभ अत्यंत यशस्वी व थाटामाटात संपन्न झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077